फौ.कि.अर्ज क्र.१७२/२०२१.
नि. ५ वरील आदेश

## अंतरीम पोटगी अर्जावरील आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज महीलांचे घरगूती हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २३(१) अन्वये अंतरीम पोटगी रक्कम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे:–**

२. अर्जदार व सामनेवाला क्र १ याचा विवाह दिनांक १९/०५/२०१९ रोजी घरच्यांच्या संमतीने झाला आहे. सामनेवाला क्र २ हा अर्जदारांचा सासरा आहे. सामनेवाला क्र ३ ही अर्जदारांची सासू आहे. सामनेवाला क्र ४ व ५ या अर्जदारांच्या नणंदा आहेत. अर्जदारासोबत सामनेवाला हे लग्नानंतर दोन दिवसच चांगले वागले. अर्जदार ही नोकरी करीत असल्याने लग्नानंतर अगदी तिस–याच दिवशी सामनेवाला याने अर्जदार हिला नोकरीला पाठविले. अर्जदार ही नोकरी करुन घरातील सर्व कामे करीत होती. सामनेवाला क्र ३ ते ५ हे अर्जदार हिलाच सर्व कामे करायला सांगायचे. सामनेवाला क्र १ ते ५ हे अर्जदार हिला लग्न झालेपासून भांडण, शिवीगाळ करीत असत. सामनेवाला क्र ४ व ५ या अर्जदार हिला कधीही वहिनी म्हणून बोलवित नव्हत्या. उलट अर्जदार हिला अवदसा अशी अश्लील शिवी देवून हाक मारत. सामनेवाला क्र २ ते ५ हे अर्जदार हिला मारहाण करीत असत. तरीही सामनेवाला क्र १ हा नवरा असूनही बायकोची बाजू न घेता अर्जदार हिलाच शिवीगाळ करीत असे. सदर अर्जामध्ये सामनेवाला क्र ७ हा सामनेवाला क्र १ याचा मित्र आहे व सामनेवाला क्र ८ ही सामनेवाला क्र ७ ची पत्नी आहे. घरात वाद निर्माण झाल्यानंतर सामनेवाला क्र १ ते ५ हे सामनेवाला क्र ६ ते ८ यांना बोलवत व सामनेवाला क्र ३ ते ५ व ६ ते ८ अशा पाच महिला मिळून अर्जदार हिला जबर मारहाण करीत असत. अर्जदार ही तिच्या सासरी एकटी रहात असल्यामुळे तिला विरोध करणे शक्य नव्हते तसेच आमची जर कुठे तक्रार केलीस तर तुला व तुझे माहेरचे माणसांना मारुन टाकू अशी धमकी सामनेवाला क्र ६ ते ८ हे अर्जदाराला देत होते.

**३.** दिनांक ३०/०८/२०१९ रोजी सामनेवाला क्र १ याने अर्जदार हिला शुल्लक कारणावरुन अतिशय मारहाण केली. तो मारहाण करीत असताना घरातील एकही सदस्य अर्जदार हिला मारहाणीपासून वाचविण्यासाठी आला नाही. उलट सामनेवाला क्र १ याला प्रोत्साहन देत होते. सामनेवाला हे नेहमी अर्जदार हिच्या माहेरच्या लोकांना हिणवून बोलत असत. तसेच अर्जदाराला भिकारीची पोर असे म्हणत असत. तसेच अर्जदारांच्या माहेरच्या लोकांचा अपमान करीत असत. अर्जदार ही तिचा सर्व पगार सामनेवाला क्र १ ते ५ यांचेकरीता खर्च करीत असे. परंतु अर्जदार हिचा पगार कमी पडल्यानंतर अर्जदार हिला सामनेवाला क्र १ ते ५ शिवीगाळ करीत असत तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेत असत. अर्जदाराला हिला उपाशी ठेवणे, शारिरीक मानसिक त्रास देणे, चारित्र्यावर संशय घेणे, तसेच अर्जदार हिचे अश्लील फोटो काढून सोशल मिडियावर व्हायरल करण्याची धमकी देणे असे प्रकार सामनेवाला करीत होते.

**४.** दिनांक ११/०९/२०२० रोजी सामनेवाला यांनी अर्जदार हिचे सोबत भांडण करुन तिला मारहाण करुन घरातून बाहेर काढले. त्यामुळे अर्जदार माहेरी निघून आली. व तेव्हा पासून अर्जदार तिचे माहेरी राहते. अर्जदार हिची लॉकडाउनमध्ये नोकरी गेली त्यामुळे तिला उत्पानाचे साधन नाही. तसेच तिचे माहेरची परिस्थिती बिकट असल्यामुळे अर्जदार हिला सामनेवाला यांचे कडून उदरनिर्वाहाकरीता पोटगी मागणे गरजेचे झाले आहे. सामनेवाला क्र १ हा वेश्वी येथे वेअरहाउसमध्ये नोकरी करीत असून त्याला दरमहा वीस हजार इतके उत्पन्न आहे. तसेच त्यांचे दिघोडे येथे स्वतःचे घर आहे. अनेक गाळे भाडयाने दिले आहेत. वेअरहाउससाठी जागा भाडयाने दिली आहे. एक एकर शेती आहे. त्यामुळे सामनेवला यांची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे. त्यामुळे अर्जदार हिस उदरनिर्वाहासाठी, औषधपाण्यासाठी सामनेवाला हा दरमहा पाच हजार इतकी पोटगी देण्यास सक्षम आहे. सबब अर्जदार हिने सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**५.** सदर अर्जास सामनेवाला यांनी निशाणी १२ कडे म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली आहे. सामनेवाला यांनी अर्जदार व त्यांच्या नात्या व्यतीरिक्तचा सर्व

मजकूर नाकारला आहे. ते असे कथन करतात की, अर्जदार ही मागील अठरा महिन्या पासून त्यांच्या माहेरी वास्तव्य करीत आहे. अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज पैसे उकळण्याच्या हेतून दाखल केला असून तो खोटा व खोडसाळ आहे. सामनेवाला पुढे असे कथन करतात की, अर्जदार हिने लग्नासाठी पंधरा ते वीस दिवसांची रजा घेतली होती. त्यामुळे ती लग्नाच्या तिस–या दिवशी कामावर गेली होती हे धादांत खोटे आहे. अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या मारहाणीविषयीचा मजकूर खोटा आहे. सामनेवाला हे अर्जदार हिच्या माहेरच्या माणसाचा अपमान केलेला नाही. दिनांक ११/०९/२०२० रोजी सकाळी ५.१५ वाजता अर्जदार मसाल्यामध्ये विषारी पावडर घालत असताना सामनेवाला क्र ४ हिने पाहिले होते. त्यामुळे घरातले वातावरण तणावाचे झाले होते. घडलेल्या सर्व प्रकारामुळे अर्जदार हिस संमतीने घटस्फोट देण्याचे देखील ठरलेले होते. परंतु अर्जदार हिला मालमत्तेची हाव असल्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सामनेवाला याना विनाकारण त्रास देण्याचे ठरविले आहे. अर्जदार ही सध्या सिध्दीविनायक हॉस्पीटल, कोप्रोली येथे परिचारिका म्हणून नोकरी करते. तिला दरमहा अठरा हजार इतके वेतन आहे. त्यामुळे अर्जदार हिला पोटगी देण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण घडलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

६. उभय बाजूंचे म्हणणे व युक्तीवादावरून प्रस्तूतच्या अर्जाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. सदरील मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **अनु. क्र** | **मूद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र. १ ने ती सामनेवाला यांचे सोबत कौटुंबिक संबंधामध्ये राहत असताना सामनेवाला याने तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याची बाब प्रथमदर्शनी सिध्द केली आहे का ? | होय |
| २ | अर्जदार क्र. १ हे सामनेवाला यांचे कडून अंतरीम पोटगी | होय |

| | | |
|---|---|---|
| | आदेश मिळणेस पात्र आहेत का ? | |
| ३ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**६.** सामनेवाला यांनी अर्जदाराचा कौटूंबिक हिंसाचार केलेला असल्याने सदर मागण्या मंजूर करण्यात याव्यात अशी विनंती अर्जदाराचे विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान केली. याउलट सामनेवाला यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांनी सदरचा अर्ज पैसे उकळण्याच्या हेतून दाखल केला आहे त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**का र ण मि मां सा**

**मान्य बाबी –**

**१.** दिनांक १९/०५/२०१९ रोजी अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र १ यांचा विवाह संपन्न झालेला असून त्यांचा विवाहसंबंध आज पावेतो अस्तित्वात आहे.

**मूद्दा क्र.१ बाबत** :–

**७.** अर्जदार क्र. १ हिने अर्जामध्ये व अर्जाच्या पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्रमध्ये असे कथन केले आहे की, सामनेवाला हे अर्जदार हिला मारहाण करतात, शिवीगाळ करतात तसेच तिला एकटीला घरातील सर्व कामे लावतात. तसेच अर्जदार हिने याबाबत कुठे तक्रार केली तर तिला व तिच्या माहेरच्या माणसांना मारुन टाकू अशी धमकी देतात. तसेच तिच्या चा़रित्र्यावर संशय घेतात. तिचे अश्लील फोटो सोशल मिडियावर व्हायरल करण्याची धमकी देतात. तसेच अर्जदार ही माहेरी राहण्यास गेल्यापासून आजपावेतो कोणतीही आर्थिक पोटगी अर्जदाराला दिलेली नाही.

**८.** सामेनवाला यांने अर्जदाराने कथन केलेल्या हिंसाचाराबाबत सर्व आरोप नाकारले आहेत. सामनेवाला यांने अर्जदार हिला नेहमीच मान सन्मानाची वागणूक देत

असल्याचे कथन केले आहे. सामनेवाला यांच्या मते अर्जदाराची सर्व कथने खोटी व बनावट आहेत.

९. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम ३ अन्वये पत्नीला मारहान करणे असंस्कृत पणे बोलणे, जिवे मारण्यची धमकी देणे, शिवी गाळ करणे व दमदाटी करणे या बाबी कौटुंबिक हिंसाचार या व्याख्येत येतात. सदय स्थितीला अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जासोबत दाखल केलेले प्रतिज्ञापत्रात कथीत केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरुप व गांर्भिय लक्षात घेवून माझ्या मते सामनेवाला यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचारा केल्याची सकृत दर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत –**

**१०.** अर्जदाराने सामनेवाला यांच्या कडून उदरनिर्वाहाकरीता दरमहा पाच हजार इतक्या रक्कमेची मागणी केली आहे. अर्जदारांची सदरची मागणी मान्य करण्यापुर्वी सामनेवाला यांच्याकडे असणा–या उत्पानाचे साधन व सामनेवाला यांचेवर असणा–या जबाबदा–या लक्षात घेणे गरजेचे आहे. अर्जदाराने अर्जामध्ये सामनेवाला याला दरमहा पंधरा हजार इतका पगार मिळतो असे कथन केले आहे. परंतु त्या पुष्ठर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सामनेवाला यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कबूल केले आहे की, त्यांना दरमहा दहा हजार इतका पगार मिळतो. सामनेवाला यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार ही परिचारिका म्हणून नोकरी करीत असून तिला दरमहा अठरा हजार इतके वेतन आहे. परंतु याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा सामनेवाला याने अभिलेखावर दाखल केलेला नाही. याउलट अर्जदाराने या अर्जासोबत दिलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये असे कबुल केले आहे की, ती सध्या कुठेही नोकरी करीत नाही. अर्जदाराने प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केलेला मजकूर हा सामनेवाला यांनी म्हणण्यामध्ये दाखल केलेलया मजकूरापेक्षा अधिक विश्वासार्ह वाटतो. तसेच सामनेवाला यांनी त्यांना दरमहा १०,०००/– इतके वेतन मिळते असे कबूल केले आहे. तसेच सामनेवाला यांच्यावर कोणत्याही जबाबदा–या आहेत असेही सामनेवाला यांनी त्याच्या

म्हणण्यामध्ये कथन केले नाही. त्यामुळे सामनेवाला क्र १ हा अर्जदारास पोटगी देण्यास सक्षम आहे.

**११.** अर्जदाराने सामनेवाला यांचेकडून उदरनिर्वाहाकरीता अंतरिम पोटगीची रक्कम रुपये ५,०००/– ची मागणी केली आहे. अर्जदारास नसलेले कोणतेही उत्पन्नाचे साधन व हल्लीची वाढती महागाई या गोष्टींचा विचार करता एखाद्या व्यक्तीस चरितार्थासाठी दरमहा कमीतकमी ३०००/–रूपये लागतात. त्यामूळे अर्जदार क्र १ हीस केवळ तीच्या दैनंदिन चरितार्थासाठी दरमहा रू. ३०००/– सामनेवाला क्र १ कडून पोटगी मिळविण्यास पात्र आहे. अर्जदार सदरचा अर्ज दाखल झाल्यापासून अंतरीम पोटगी मिळविण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र.२ चे उत्तर मी वरीलप्रमाणे नोंदवून मूद्दा क्र. ३ करीता पुढील आदेश पारीत करते–

**आ दे श**

| | |
|---|---|
| **१.** | प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | सामनेवालाने अर्जदार क्र. १ यांना दरमहा अंतरिम निर्वाह भत्ता रू.३०००/– (अक्षरी रूपये तीन हजार फक्त) सदर अर्ज दाखल केल्यापासून म्हणजेच दिनांक १३/११/२०२१ पासून यातील मुळ अर्जाचा अंतिम निकाल होईपावेतो द्यावा. |
| **३.** | थकीत रक्कम सामनेवाला यांनी अर्जदार हिला पुढील तारेखपर्यत अदा करावी. |
| **४.** | महिलांचे घरगूती हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २४ नुसार या अर्जाच्या आदेशाची प्रत उभयपक्षास विनामुल्य देण्यात यावी. |

**( पी.एन. पठाडे )**

दिनांकः–१६.०७.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उरण